20 JUN 2026
सकाळ

# विद्यापीठात महाराणा प्रतापसिंह यांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये महाराणा प्रतापसिंह यांची जयंती झाली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांच्या हस्ते महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. कबीर खराडे, सहाय्यक प्राध्यापक यशोधन बोकील, अनिल साळोखे, जांबवंत शेळके, चंद्रकांत कांबळे, दीपा साबळे आदी उपस्थित होते.

20 JUN 2026

लोकमत

# राजर्षी शाहू संशोधन केंद्राच्या प्रभारी संचालकपदी मंजुश्री पवार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू संशोधन केंद्राच्या प्रभारी संचालकपदी इतिहास संशोधक डॉ. मंजुश्री पवार यांची गुरुवारी नियुक्ती करण्यात आली. कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते त्यांना नियुक्तिपत्र प्रदान करण्यात आले.

डॉ. मंजुश्री पवार या ज्येष्ठ इतिहास संशोधक व राजर्षी शाहू संशोधन केंद्राचे माजी मानद संचालक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या कन्या आहेत. इतिहास संशोधनाचा समृद्ध वारसा लाभलेल्या डॉ. पवार या केंद्राच्या कार्याला नवी दिशा देतील, असा विश्वास कुलगुरू डॉ. कामत यांनी व्यक्त केला. डॉ. पवार यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्यावरील संशोधन अधिक व्यापक करण्यासह इतिहास आणि सामाजिक परिवर्तनाच्या विचारांचा वारसा जपण्यासाठी प्रयत्नशील राहण्याची ग्वाही दिली. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. अरुंधती पवार तसेच उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे उपस्थित होते.



डॉ. राजनीश कामत आणि डॉ. ज्योती जाधव यांनी डॉ. मंजुश्री पवार यांना नियुक्तीचे पत्र प्रदान केले.

20 JUN 2026
सिंधुदुर्ग समाचार
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजर्षी शाहू संशोधन केंद्राच्या प्रभारी संचालकपदी डॉ. मंजुश्री पवार

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू संशोधन केंद्राच्या प्रभारी संचालकपदी इतिहास संशोधक डॉ. मंजुश्री पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते डॉ. पवार यांना आज नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. ज्येष्ठ इतिहास संशोधक आणि केंद्राचे माजी मानद संचालक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या त्या कन्या आहेत.



ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी राजर्षी शाहू महाराजांचे विचार, कार्य आणि इतिहास यांचा सखोल अभ्यास व संशोधन केले. त्या कार्याचा वारसा रक्तातच असल्याने डॉ. मंजुश्री पवार या पदाला निश्चितपणे न्याय देतील, असा विश्वास कुलगुरू डॉ. कामत यांनी या प्रसंगी व्यक्त केला.

ते म्हणाले, डॉ. जयसिंगराव पवार यांनी राजर्षी शाहू संशोधन केंद्राच्या माध्यमातून संशोधनाची एक भक्कम परंपरा निर्माण केली. त्यांच्या कार्याचा ठसा विद्यापीठाच्या शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रावर कायम राहील. डॉ. मंजुश्री पवार सरांचा वैचारिक वारसा पुढे नेत केंद्राच्या कार्याला नवी दिशा देतील. राजर्षी शाहू महाराजांचे विचार, सामाजिक न्यायाची भूमिका आणि संशोधनपर उपक्रम अधिक व्यापक करण्यासाठी त्या निश्चितपणे योगदान देतील.

डॉ. पवार यांचा राजर्षी शाहू महाराज यांच्याविषयीचे संशोधन, इतिहास आणि सामाजिक परिवर्तनाच्या विचारांचा वारसा जपण्याचा प्रयत्न निश्चितपणे करेन, अशी ग्वाही देताना डॉ. मंजुश्री पवार म्हणाल्या, राजर्षी शाहू संशोधन केंद्राशी डॉ. पवार यांचे भावनिक नाते होते. त्यांनी आयुष्यभर जपलेले संशोधन, इतिहासाची चिकित्सा आणि शाहू विचारांचा प्रसार यांचा वारसा पुढे नेण्याची संधी मिळणे हा माझ्यासाठी भावनिक, सन्मानाचा आणि तितकाच जबाबदारीचा क्षण आहे. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करत केंद्राच्या कार्याला अधिक गतिमान करण्यासाठी प्रयत्नशील राहीन. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. अरुंधती पवार, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे उपस्थित होते.

20 JUN 2026

जनप्रवास

# राजर्षी शाहू संशोधन केंद्राच्या प्रभारी संचालकपदी डॉ. मंजुश्री पवार



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू संशोधन केंद्राच्या प्रभारी संचालकपदी नियुक्तीचे पत्र डॉ. मंजुश्री पवार यांना प्रदान करताना कुलगुरू डॉ. रजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव.**

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू संशोधन केंद्राच्या प्रभारी संचालकपदी इतिहास संशोधक डॉ. मंजुश्री पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते डॉ. पवार यांना आज नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. ज्येष्ठ इतिहास संशोधक आणि केंद्राचे माजी मानद संचालक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या त्या कन्या आहेत.

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी राजर्षी शाहू महाराजांचे विचार,कार्य आणि इतिहास यांचा सखोल अभ्यास व संशोधन केले. त्या कार्याचा वारसा रक्तातच असल्याने डॉ. मंजुश्री पवार या पदाला निश्चितपणे न्याय देतील, असा विश्वास कुलगुरू डॉ. कामत यांनी या प्रसंगी व्यक्त केला. ते म्हणाले,डॉ. जयसिंगराव पवार यांनी राजर्षी शाहू संशोधन केंद्राच्या माध्यमातून संशोधनाची एक भक्कम परंपरा निर्माण केली. त्यांच्या कार्याचा ठसा विद्यापीठाच्या शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रावर कायम राहील. डॉ. मंजुश्री पवार सरांचा वैचारिक वारसा पुढे नेत केंद्राच्या कार्याला नवी दिशा देतील. राजर्षी शाहू महाराजांचे विचार,सामाजिक न्यायाची भूमिका आणि संशोधनपर उपक्रम अधिक व्यापक करण्यासाठी त्या निश्चितपणे योगदान देतील.

20 JUN 2026
सकाळ



कागल : डी. आर. माने महाविद्यालयाचे प्राचार्य नंदकुमार कदम यांचा सत्कार करताना कुलगुरू राजनीश कामत, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

# विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीत डी.आर. माने महाविद्यालय प्रथम

**सकाळ वृतसेवा**

कागल, ता. १९ : येथील डी. आर. माने महाविद्यालयाने शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेंतर्गत मानवविज्ञान विद्याशाखेच्या निमशहरी गटात सलग पाचव्या वर्षी प्रथम क्रमांक मिळविला. या कामगिरीबद्दल विद्यापीठात आयोजित गुणगौरव समारंभात महाविद्यालयाचा सन्मान करण्यात आला.

कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभात उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या उपस्थितीत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकुमार कदम यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक बाबूराव पुंडे, शिष्यवृत्ती विभागाचे प्रमुख प्रा. सचिन कांबळे, प्रा. विजय कांबळे तसेच प्रशासकीय कर्मचारी सुधीर कदम उपस्थित होते.

माने महाविद्यालयाने गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेत सलग पाच वर्षे निमशहरी गटात प्रथम क्रमांक मिळवून सातत्यपूर्ण गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे.

या यशामागे डॉ. प्रवीण चौगले, प्राचार्य डॉ. नंदकुमार कदम आणि शिष्यवृत्ती विभागाचे प्रमुख प्रा. सचिन कांबळे यांचे विशेष परिश्रम लाभले.

20 JUN 2026


पुण्यनगरी

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये 'शिवराज' प्रथम

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

येथील शिवराज महाविद्यालयाने २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेत निमशहरी गटात प्रथम क्रमांक पटकावला. शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेत सलग सातव्यांदा हे पारितोषिक पटकावण्याचा मान महाविद्यालयाला मिळाला आहे. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे आयोजित कार्यक्रमात शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांना विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले.



कोल्हापूर : कुलगुरू प्रा. डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना प्राचार्य डॉ. एस. एम. कदम. उपस्थित प्रा. विश्वजित कुराडे व अन्य.

महाविद्यालयाने सलग सात वर्षे विज्ञान व तंत्रज्ञान आणि वाणिज्य व व्यवस्थापन विद्या शाखेमध्ये सलग दोन वर्षे हा बहुमान पटकावला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना घडवणारे महाविद्यालय म्हणून शिवराज महाविद्यालयाने आपलेपण जपले आहे. संस्था अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे यांच्या मार्गदर्शनाने महाविद्यालयात विविध उपक्रमशील व कौशल्यपूर्ण शिक्षणाच्या योजना राबवण्यासाठी आम्ही धडपडत आहोत. या प्रयत्नाला यश मिळत असल्याचे शिवराज विद्या संकुलाचे सचिव डॉ. अनिल कुराडे यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. कदम यांनी शिवराज महाविद्यालयाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाला हा बहुमान मिळाला आहे. शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील एक सक्षम महाविद्यालय म्हणून शिवराज महाविद्यालयाने आपला ठसा उमटवला आहे. आमच्या भागातील विद्यार्थ्यांना शिवराज महाविद्यालयाने घडवण्यासाठी दिलेल्या बहुमोल योगदानाचे खऱ्याअर्थी फलित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने महाविद्यालयात सलग दोन वर्षे रोजगार मेळावा घेऊन नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध करून दिले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 JUN 2026
पुण्यनगरी

# पन्हाळ्याचा इतिहास आता मिळणार मोबाईलवर

## 'डिजिटल हेरिटेज ऑडिओ गाईड टूर' उपक्रमाचा प्रारंभ

**पन्हाळा : प्रतिनिधी**

पन्हाळा किल्ल्याचा समृद्ध आणि गौरवशाली इतिहास आता पर्यटकांना त्यांच्या मोबाईलवर सहज ऐकता येणार आहे. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, मुंबईच्या वतीने पन्हाळा किल्ल्यावर सुरू केलेल्या डिजिटल हेरिटेज ऑडिओ गाईड टूर या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे उद्घाटन उत्साहात झाले.

यावेळी अधीक्षक डॉ. अभिजित एस. आंबेकर म्हणाले, 'पन्हाळा किल्ला हा गौरवशाली इतिहासाचा आणि सांस्कृतिक वारशाचा अमूल्य ठेवा आहे. या ऑडिओ गाईडच्या माध्यमातून पर्यटकांना किल्ल्याचा इतिहास, वास्तूंचे महत्त्व आणि त्यामागील ऐतिहासिक संदर्भ अधिक प्रभावीपणे अनुभवता येतील.



'डिजिटल हेरिटेज ऑडिओ गाईड टूर'च्या उदघाटनप्रसंगी उपस्थित मान्यवर.

या उपक्रमाचे उद्घाटन 'पुरातत्त्व'चे अधीक्षक डॉ. सचिन पाटील, डॉ. आंबेकर, डॉ. नीलांबरी जगताप यांच्या हस्ते झाले. ही सुविधा मराठी, हिंदी आणि इंग्रजी अशा तीन भाषांमध्ये उपलब्ध आहे. किल्ल्यातील विविध वास्तू आणि ऐतिहासिक स्थळांना भेट देताना त्या-त्या ठिकाणाची माहिती पर्यटकांना ऐकता येणार असल्याने त्यांचा अनुभव अधिक समृद्ध होणार आहे. किल्ल्यावरील काही भागांमध्ये नेटवर्क सुविधा नसली तरी पर्यटकांना अखंड अनुभव मिळावा, यासाठी ही सेवा ऑफलाईनही असल्याचे सांगण्यात आले.

यावेळी अधीक्षक डॉ. ए. व्ही. नागनूर, उपअधीक्षक एम. आर. शेख, सहायक अधीक्षक पुरातत्त्व अभियंता सर्वेक्षण सहायक बाबासाहेब जंगले, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, कोल्हापूर विभागाचे अधिकारी, कर्मचारी आदी उपस्थित होते.

20 JUN 2026
सकाळ



शिवाजी विद्यापीठ : स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या १५० विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांत निवड झाली. यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, स्कूलचे संचालक डॉ. अजित कोळेकर, सुभाष कोंबडे, गणेश पाटील आदी.

# स्कूल ऑफ इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांत निवड

कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (तंत्रज्ञान अधिविभाग) विभागाने २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात प्लेसमेंटमध्ये यश मिळवले. स्कूलच्या १५० हून अधिक विद्यार्थ्यांची विविध राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये विविध पदांवर निवड झाल्याची माहिती स्कूलचे संचालक डॉ. अजित कोळेकर यांनी दिली.

स्कूलने सलग दोन वर्षे इन्फोसिसचा कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा येथील सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयांसाठी घेण्यात आला. यावर्षी या ड्राईव्हमधून १७५ विद्यार्थ्यांची इन्फोसिसमध्ये निवड झाली.

विद्यापीठाच्या सेंट्रल प्लेसमेंट सेल आणि अधिविभागाच्या प्लेसमेंट सेलच्या संयुक्त प्रयत्नांमुळे दरवर्षी कॅम्पस ड्राईव्हमध्ये अनेक नामवंत कंपन्या सहभाग दर्शवित आहेत. स्कूलच्या विद्यार्थ्यांची साधारणपणे वर्षाला ३ ते ९ लाखांपर्यंतची पॅकेजिस देऊन निवड केली. कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे संयोजन विद्यापीठ प्रशिक्षण व प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ. सुभाष कोंबडे, शामल पवार, स्कूलच्या प्रशिक्षण व प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ. गणेश पाटील यांनी केले.

20 JUN 2026
सकाळ

# विद्यापीठाच्या १९ विद्यार्थ्यांचे विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश

## केंद्रातील प्रवेश अर्जाची मुदत ३० जूनपर्यंत

कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामधील १९ विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगासह सरळसेवा भरतीच्या माध्यमातून परीक्षांत यश मिळविले. केंद्राच्या यंदाच्या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली असून, ३० जूनपर्यंत प्रवेश अर्ज सादर करण्याचे आवाहन केंद्राच्या समन्वयक डॉ. कविता वड्राळे यांनी केले आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये धनाजी शेळके, महेश साळुंखे (पोलिस उपनिरीक्षक), अतुल मानकर (राज्य कर निरीक्षक), सुहेल मुल्ला, कल्पक चिले, (कर सहायक), सूरज कांबळे, (महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय सांगली, कालवा निरीक्षक जलसंपदा विभाग, आरोग्य सेवक), पंकज पाटील (ज्युनिअर असिस्टंट, जिल्हा परिषद पुणे, वरिष्ठ सुरक्षा सहायक, आरोग्य विभाग, आरोग्य सेवक), दिनेश साबळे (सिव्हील इंजिनिअर असिस्टंट जलसंपदा विभाग सातारा, नगर अभियंता सोलापूर, सिव्हिल इंजिनिअर असिस्टंट पाटबंधारे विभाग, ज्युनिअर इंजिनिअर जिल्हा परिषद कोल्हापूर), कुणाल दैव (तलाठी), सुनील कांबळे, (कालवा निरीक्षक जलसंपदा विभाग, पवित्र पोर्टल शिक्षक), प्राजक्ता पाटील (मोजणीदार, जलसंपदा विभाग), रोहित पाटील (रेल्वे बोर्ड, ट्रॅक मेंटेनर), पंकज खंबाईत (तलाठी), शिवराज पाटील (कार्यकारी सहायक मुंबई महानगरपालिका), ओंकार रणदिवे (फायर ब्रिगेड मुंबई महानगरपालिका), नितीन वळवी, राकेश लोहार, (लॅब अटेंडंट गव्हर्न्मेंट मेडिकल कॉलेज), अनिल टेंगले, (आरोग्य सेवक), संदेश साठे (पवित्र पोर्टल, शिक्षक) यांचा समावेश आहे.

20 JUN 2026

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात उद्या आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, क्रीडा अधिविभाग, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २१) राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृह येथे सकाळी सामूहिक योग प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ६.२० वाजता उपस्थिती नोंदणी, विद्यापीठ गीत व उद्घाटनाने कार्यक्रमाची सुरुवात होईल. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संदेशाचे प्रक्षेपण करण्यात येणार आहे. योगाभ्यास, प्रात्यक्षिके, आसनांचे सादरीकरण व योगगुरूंचे मार्गदर्शन मिळणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यार्थी विकास विभागाने केले आहे.